January. 2022

Dr. Babasaheb Ambedkar Mahavidyalaya * Aundh, Pune-67 *

15

INTERNATIONAL RESEARCH FELLOWS ASSO

January-2022

E-ISSN – 2348-7143


International Research Fellows Association's

# RESEARCH JOURNEY


International E-Research Journal

Peer Reviewed, Referred & Indexed Journal

Issue 284



## Recent Trends in Research



Chief Editor -
Dr. Dhanraj T. Dhangar,
Assist. Prof. (Marathi)
MGV's Arts & Commerce College,
Yeola, Dist – Nashik [M.S.] INDIA

Executive Editors :
Dr. Tejesh Beldar, Nashikroad (English)
Dr. Gajanan Wankhede, Kinwat (Hindi)
Mrs. Bharati Sonawane, Bhusawal (Marathi)
Dr. Rajay Pawar, Goa (Konkani)

Dr. Babasaheb Ambedkar Mahavidyalaya * Aundh

55

SWATIDHAN INTERNATIONAL PUBLICATIONS
For Details Visit To : www.researchjourney.net

*Cover Photo : https://indianexpress.com/article/india/narendra-modi-twitter-picture-india-100-crore-doses-covid-vaccination-7584303/

© All rights reserved with the authors & publisher Price : Rs. 1000/-



Dr. Babasaheb Ambedkar Mahavidyalaya * Aundh, Pune-67 *



## Editorial Board

**Chief Editor -**
Dr. Dhanraj T. Dhangar,
Assist. Prof. (Marathi)
MGV's Arts & Commerce College,
Yeola, Dist – Nashik [M.S.] INDIA

**Executive Editors :**
Dr. Tejesh Beldar, Nashikroad (English)
Dr. Gajanan Wankhede, Kinwat (Hindi)
Mrs. Bharati Sonawane, Bhusawal (Marathi)
Dr. Rajay Pawar, Goa (Konkani)

**Co-Editors -**
- **Prof. Mohan S.** - Dean faculty of Arts, Delhi University, **Delhi, India**
- **Prof. Milena Brotaeva** - Head, Classical East Department, Sofia University, **Sofia, Balgeria**
- **Dr. R. S. Sarraju** – Center for Translation Studies, University of Hydeabad, **Hydrabad, India**
- **Mr.Tufail Ahmed Shaikh**- King Abdul Aziz City for Science & Technology, Riyadh, **Saudi Arabia.**
- **Dr. Anil Dongre** - Head, Deptt. of Management, North Maharashtra University, Jalgaon **[M.S.] India**
- **Dr. Shailendra Lende** - R.T.M. Nagpur University, Nagpur **[M.S.] India**
- **Dr. Dilip Pawar** - BoS Member (SPPU), Dept. of Marathi, KTHM College, Nashik. **[M.S.] India**
- **Dr. R. R. Kazi** - North Maharashtra University, Jalgaon **[M.S.] India**
- **Prof. Vinay Madgaonkar** - Dept. of Marathi, Goa University, **Goa, India**
- **Prof. Sushant Naik** - Dept. of Konkani, Govt. College, Kepe, **Goa, India**
- **Dr. G. Haresh** - Associate Professor, CSIBER, Kolhapur **[M.S.] India**
- **Dr. Munaf Shaikh** - N. M. University, Jalgaon & Visiting Faculty M. J. C. Jalgaon **[M.S.] India**
- **Dr. Sanjay Kamble** -BoS Member Hindi (Ch.SU, Kolhapur), T.K. Kolekar College, Nesari **[M.S.]**
- **Prof. Vijay Shirsath**- Nanasaheb Y. N. Chavhan College, Chalisgaon **[M.S.] India**
- **Dr. P. K. Shewale** - BoS Member (SPPU), MGV's LVH College, Panchavati-Nashik **[M.S.] India**
- **Dr. Hitesh Brijwasi** - Librarian, K.A.K.P. Com. & Sci. College, Jalgaon **[M.S.] India**
- **Dr. Sandip Mali** - Sant Muktabai Arts & Commerce College, Muktainagar **[M.S.] India**
- **Prof. Dipak Patil** - S.S.V.P.S.'s Arts, Sci. and Com. College, Shindhkheda **[M.S.] India**
- **Prof. K. M. Waghmare** - Librarian, Anandibai Raorane College, Sawantwadi **[M.S.] India**
- **Prof. Vidya Surve-Borse**- MGV's LVH Arts, Sci. & Com.College, Panchavati-Nashik **[M.S.] India**

**Advisory Board -**
- **Dr. Marianna Kosic** - Scientific-Cultural Institute, Mandala, **Trieste, Italy.**
- **Dr. M.S. Pagare** - Director, School of Languages Studies, North Maharashtra University, Jalgaon
- **Dr. R. P. Singh** -HoD, English & European Languages, University of Lucknow **[U.P.] India**
- **Dr. S. M. Tadkodkar** - Rtd. Professor & Head, Dept. of Marathi, Goa University, **Goa, India.**
- **Dr. Pruthwiraj Taur** - Chairman, BoS, Marathi, S.R.T. University, Nanded.
- **Dr. N. V. Jayaraman** - Director at SNS group of Technical Institutions,**Coimbatore**
- **Dr. Bajarang Korde** - Savitribai Phule Pune University **Pune, [M.S.] India**
- **Dr. Leena Pandhare** - Principal, NSPM's LBRD Arts & Commerce Mahila Mahavidyalaya, Nashik Road
- **Dr. B. V. Game** - Principal, MGV's Arts and Commerce College, Yeola, Dist. Nashik.

**Review Committee -**
- **Dr. J. S. More** - BoS Member (SPPU), Dept. of Hindi, K.J.Somaiyya College, Kopargaon
- **Dr. S. B. Bhambar,** BoS Member Ch.SU, Kolhapur, T.K. Kolekar College, Nesari
- **Dr. Uttam V. Nile** - BoS Member (NMU, Jalgaon) P.S.G.V.P. Mandals ACS College, Shahada
- **Dr. K.T. Khairnar**- BoS Member (SPPU), Dept. of Commerce, L.V.H. College, Panchavati
- **Dr. Vandana Chaudhari** KCE's College of Education, Jalgaon
- **Dr. Sayyed Zakir Ali,** HoD, Urdu & Arabic Languages, H. J. Thim College, Jalgaon

Dr. Babasaheb Ambedkar Mah... Aundh, Pune

56

E-ISSN : 2348-7143
January.- 2022


| | | | |
|---|---|---|---|
| 25 | लोकसाहित्य संशोधन : स्वरूप आणि अडचणी | डॉ. प्रमोद गारोडे | 125 |
| 26 | मराठी लोकसाहित्यातील तंजावरी लावणी | डॉ. संजीवनी माडेकर | 130 |
| 27 | आदिवासी लेखकांच्या कादंबरीतील संस्कृतिकता (तृष्णा, शिवली) | सुंदर पाडवी, डॉ. आशुतोष पाटील | 136 |
| 28 | मराठी साहित्यातील आदिवासी काव्याचा अभ्यास | डॉ. सचिन पाटील | 141 |
| 29 | धर्मश्रध्दा आणि देवदासी परंपरा | डॉ. गजानन भामरे | 148 |
| 30 | ज्ञानरचनावादाचा उगम व विकास | डॉ. अंजली मस्करेन्हस | 151 |
| 31 | वारकरी संप्रदायाचे वेगळेपण | डॉ. जालिंदर येवले | 154 |
| 32 | शरच्चंद्र मुक्तिबोधांच्या कादंबऱ्यामधील मानुषता | प्रा. प्रमोद नारायणे | 161 |
| 33 | एकच प्याला : एक समीक्षण | डॉ. धनराज माने | 171 |
| 34 | दलित साहित्याचे देशीपण | डॉ. अरुण पाटील | 179 |
| 35 | भटका विमुक्त समाज : साहित्य संशोधनातील उणीवा | डॉ. सुदाम राठोड | 183 |
| 36 | १९८० नंतरच्या मराठी ग्रामीण कादंबरीतून येणारे शेतकऱ्यांचे प्रश्न | डॉ. रामकिशन दहिफळे | 187 |
| 37 | 'गौतमची गोष्ट' या कादंबरीमधील गौतमच्या कैफियतीचे चित्रण एक शोध | डॉ. आर. डी. कांबळे | 192 |
| 38 | डॉ. प्रतिमाताई इंगोले : जीवन व कार्य | डॉ. पुरुषोत्तम जुन्ने, प्रा. दुर्गा दगडे | 196 |
| 39 | 'पाडा' कादंबरीचा चिकित्सक अभ्यास | डॉ. सचिन पाटील | 203 |
| 40 | छत्रपती शिवाजी महाराज : व्यक्तित्व आणि विचार | डॉ. श्रीकांत गायकवाड | 206 |
| 41 | छत्रपती शिवाजी महाराज कृषी सुधारणेचे अग्रणी | विलास सोळुंके | 214 |
| 42 | पुणे शहराचे ऐतिहासिक दृष्टीकोनातून अवलोकन | डॉ. राजेंद्र रासकर | 220 |
| 43 | अहमदनगर जिल्ह्याची भौगोलिक रचना व ऐतिहासिक पार्श्वभूमी | डॉ. अशोक बिडगर | 227 |
| 44 | पेशवेकालीन परगणा प्रशासनातील कमाविसदार : परगणे नशिराबादच्या विशेष संदर्भात | श्री. दिपक किनगे | 233 |
| 45 | महात्मा ज्योतिबा फुले यांचे सामाजिक व शैक्षणिक कार्य | डॉ.टी. बी. राजगुरू, श्री.डी. झेड. सावळे | 238 |
| 46 | डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे खोती पद्धती बाबत विचार | डॉ. किशोर काजळे | 243 |
| 47 | डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे आधुनिक भारताचे स्वप्न | डॉ.चंद्रमणी गजभीये | 248 |
| 48 | डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे मूल्यगर्भ शैक्षणिक विचार | डॉ. अर्जुन नेरकर | 251 |
| 49 | नविन शैक्षणिक धोरण - २०२० : मानवी हक्क आणि भारतातील सद्यस्थिती | डॉ. देवेंद्र सोनटक्के | 255 |
| 50 | नव्या शिक्षणीक धोरणाचे फाटभुंयेर कोंकणीच्या अक्षर साहित्यांत उदेल्लो एक नव-विचार ('सरस्वतीच्या आंगणांत' ह्या विजया शेळडेकार हांच्या लेखसंग्रहाची शास्त्रीय चिकित्सा) | डॉ. हनुमंत चोपडेकार | 263 |


Dr. Babasaheb Ambedkar Mahavidyalaya
Aundh, Pune-67

# पुणे शहराचे ऐतिहासिक दृष्टीकोनातून अवलोकन

**डॉ. राजेंद्र नामदेव रासकर**
इतिहास विभाग प्रमुख,
डॉ. बाबासाहेब आंबेडकर महाविद्यालय, औंध, पुणे
Email - rajendraraskar2550@gmailcom
सेमोबाईल -9960659684

Dr. Babasaheb Ambedkar Mahavidyalaya ★ Aundh, Pune-67 ★

**प्रस्तावना :**

भारताच्या प्राचीन काळापासून महाराष्ट्रातील ऐतिहासिक व धार्मिक स्थळांना महत्त्वाचे स्थान आहे. या ऐतिहासिक व धार्मिक स्थळांची महाराष्ट्राला एक वैभवशाली परंपरा लाभलेली आहे. महाराष्ट्रातील राज्यकर्त्यांनी आपली सत्ता टिकविण्यासाठी व सत्तेचा विस्तार करण्यासाठी ऐतिहासिक व धार्मिक स्थळांना महत्त्व दिलेले आहे. भारताच्या इतिहासात धार्मिक व ऐतिहासिक स्थळामुळे राष्ट्रीय एकात्मता वाढण्यास मोठ्या प्रमाणावर मदत झाली आहे. महाराष्ट्रातील अनेक विभाग आणि प्रदेशातील लोक हे धार्मिक परंपरेचे असल्याने दिवसेंदिवस धार्मिक स्थळांचे महत्त्व वाढत आहे. या भागातील ऐतिहासिक व धार्मिक स्थळांबद्दल अधिक माहिती व्हावी. महाराष्ट्रातील प्रेक्षणीय स्थळे समाजाला प्रबोधनकारक व प्रगतीसाठी उपयुक्त आहेत. पुणे शहरातील विविध ऐतिहासिक स्थळे ही अतिशय महत्वाची आहेत. या ऐतिहासिक स्थळांचे महाराष्ट्राच्या आणि पुण्याच्या इतिहासातील योगदान अभ्यासता यावे, यासाठी या विषयाची निवड केलेली आहे

**पुणे शहराचे क्षेत्रफळ व सीमा**

महाराष्ट्रातील एक शैक्षणिक, सांस्कृतीक व औद्योगिक केंद्र आणि पुणे जिल्ह्याचे व विभागाचे मुख्य ठीकाण. ते १८ अंश ३० उ. अक्षांश व ७३ अंश ५३पू. रेखांशावर, रेल्वेने मुंबईच्या आग्रेयीस १९२ किमी. व समुद्रसपाटीपासुन सरासरी ५६३ मी. उंचीवर वसले आहे. पुणे शहराची लोकसंख्या १९७१ मध्ये ८,५६,१०५ व देहु, दहूरोड,खडकी कँप, पुणे कँप, खडकवासला, लोहगाव, पिंपरी-चिंचवड मिळून बनणाऱ्या पुणे नागरी भागाची एकूण वस्ती ११,३५,०३४ इतकी होती. तर उपलब्ध माहितीनुसार २०११ मध्ये पुणे शहराची लोकसंख्या ३,१२४,४५८ आहे; त्यापैकी पुरुष आणि महिला अनुक्रमे १,६०३,६७५ आणि १,५२०,७८३ आहेत. पुणे शहराची लोकसंख्या ३,१२४,४५८ असली तरी; त्याची शहरी/महानगरी लोकसंख्या ५,०५७,७०९ आहे ज्यापैकी २,६५६,२४० पुरुष आणि २,४०१,४६९ महिला आहेत.[१]

पुणे मुळा-मुठा नद्यांच्या संगमावर वसलेले आहे. मुळा-मुठा सोडल्यास शहरात निरुपयोगी नागझरी, आंबील ओढा व माणिक नाला हे लहान जलप्रवाह आहेत. पुण्याचे सरासरी तापमान १७.२ अंश से. असून दैनिक किमान तापमान सरासरी ११.६६ अंश से., तर दैनिक कमाल तापमान सरासरी २२.७७ अंश से. असते. एप्रिल महिन्यात कमाल तापमानाची सरासरी ३८.३३ अंश से. इतकी आढळते. ३० एप्रिल १८९७ व ७ मे १८८९ रोजी निरपेक्ष कमाल तापमान ४३.३ अंश से. नोंदविले आहे. पावसाची वार्षिक सरासरी ६६.१३ सेंमी. आहे.

पुणे जिल्हयाच्या पश्चिम भागात नद्यावर धरणे बांधली असून त्यापासून जल-सिंचन व काही प्रमाणात विद्युत निर्मिती केली जाते. पुणे जिल्हयामध्ये भाटघर, वीर, खडकवासला, पानशेत, वरसगाव, पवना, येडगाव,



Dr. Babasaheb Ambedkar ★ Aundh, Pune-67

65
58

E-ISSN : 2348-7143
January.- 2022

माणिकडोह इत्यादी धरणे आहेत. याशिवाय डिंभे, वडज, पिंपळगाव व घोड प्रकल्प ही धरणे आहेत. पुणे शहराला खडकवासला, पानशेत व वरसगाव या धरणातून पाणीपुरवठा केला जातो. पिंपरी चिंचवडला पवना प्रकल्पामधून पाणीपुरवठा केला जातो. पुणे जिल्हयात टाटा कंपनीने मुळशी येथे धरण बांधून त्यामधून वीजनिर्मिती केली आहे. पुणे महानगरपालिकेचे क्षेत्रफळ १३८.८५ चौ.किमी. आहे. या भागात एकूण १,१७,५४२ घरे वापरात होती व त्यांत १,६३,९१० कुटुंबे राहत(१९७१). शहरातील पुरुष-स्त्री प्रमाण १०००:८८५ होते.

Dr. Babasaheb Ambedkar Mahavidyalaya
Aundh, Pune-67

### पुणे जिल्हा आणि शहराचे हवामान:

पुणे जिल्हयाचे मोसमी हवामान आहे. येथे मे महिन्यात कमाल तापमान ४१° पर्यंत वाढते आणि जानेवारीत ते किमान ५.६० पर्यंत असते. पुणे जिल्हयात नैऋत्य मोसमी वाऱ्यापासून पडणाऱ्या पावसाचे प्रमाण जून ते सप्टेंबर महिन्यात सरासरी जास्त असते. सहयाद्री पर्वतामुळे घाटमाथ्यावर भरपूर ४३१ सेमी. पाऊस पडतो. घाटमाथ्याच्या पूर्वेकडील प्रदेशात पावसाचे प्रमाण खूपच कमी म्हणजे ४५ सेमी. आहे. पुणे येथे ६५ सेमी. पाऊस पडतो. पुणे जिल्हयात दौंड, शिरूर, बारामती, इंदापूर, पुरंदर, आंबेगाव, जुन्नर व खेड या तालुक्यात नैऋत्य मोसमी वाऱ्यापासून पडणाऱ्या पावसाची अनिश्चिती असल्याने तेथे वारंवार अवर्षण पडते.२

### पुणे शहराचा इतिहास:

#### १. प्राचीन इतिहास:

महाराष्ट्र हे राज्य अतिप्राचीन आहे. सुमारे दोन लाख वर्षापूर्वी मनुष्याचे पुरावे महाराष्ट्रात सहज सापडतात. पुणे शहर आणि परिसर हा सुद्धा प्राचीन मानवाच्या वस्तीचा एक महत्वाचा भाग राहिलेला होता. डेक्कन कॉलेजचे प्राध्यापक ह.धि.सांकलिया यांनी सन १९५७ साली पुणे शहरात उत्खनन केले असता त्यांना एक लाख वर्षापूर्वीची मानवाने वापरलेली विविध हत्यारे आणि वस्तू मिळाल्या. त्यामध्ये लहान तुकडे, काही फळांच्या आतील भाग, कुऱ्हाड आणि लाकूड तोडण्याची इतर हत्यारे सापडली आहेत. या हत्याराच्या कालखंडावरून सांकलिया यांनी असे अनुमान काढले की, एक लाख वर्षापूर्वी पुणे येथे मानवी वस्ती होती. पुढे सन १९६२-६३ मध्ये डॉ.राजगुरू व मुजुमदार यांनी मुठा नदीच्या पात्रामध्ये उत्खनन केले. त्यावेळी तेथे अश्मयुगीन हत्यारे व काही वस्तू सापडल्या. यावरून तेथे एक ते दिड लाख वर्षापूर्वी वस्ती होती, हे स्पष्ट होते.३

राजा कृष्णराज पहिला याच्या कालखंडातील इ.स.७६८ मधील ताम्रपट उपलब्ध झाला आहे. त्यामध्ये पुणे शहराचा उल्लेख पूनक विषय असा केलेला आहे. त्यानंतर राष्ट्रकुटांच्या कालखंडातील इ.स.९६० मधील ताम्रपट किंवा कोरीव लेख उपलब्ध झालेले आहेत. त्यामध्ये पुणे शहराचा उल्लेख पुनकवाडी असा केलेला आढळतो. इ.स.९९३ सालचा शिलाहार अपराजित देव याच्या कालखंडातील मुरूड-जंजिरा येथे ताम्रपट सापडला आहे. त्यामध्ये पुनकदेश असे या प्रदेशाला संबोधले आहे.४ या सर्व गोष्टीवरून हे स्पष्ट होते की, पुणे भूप्रदेश प्रथम राष्ट्रकुटांच्या प्रभावाखाली होता. नंतर शिलाहार राजांच्या प्रभावाखाली होता.

ऑक्टोबर २००२ मध्ये पुण्यातील कसबा पेठेत इमारतीच्या झालेल्या खोदकामात काही अवशेष सापडले आहेत. त्यावरून चौथ्या शतकातही पुणे येथे वस्ती होती हे स्पष्ट होते. असे अनुमान इतिहास संशोधक श्री. पांडुरंग बलकवडे यांनी काढले आहे. डिसेंबर २००२ मध्ये कसबा पेठेत आणखी एक खोदकाम झाले होते

Dr. Babasaheb Ambedkar Mahavidyalaya
Aundh, Pune

या खोदकामात सापडलेल्या प्राचीन वस्तू सातवाहनकालीन असल्याचे स्पष्ट झाले. या पुराव्या वरून पुणे शहराचा इतिहास प्रथमच इ.स. पूर्व दुसऱ्या शतकापर्यंतची माहिती प्राप्त झाली.५

पुणे शहरावर इ. स. पूर्व दुसऱ्या शतकात सातवाहनांचे राज्य होते. सातवाहनानंतर पुणे येथे राष्ट्रकूट घराण्याची सत्ता होती. दहाव्या शतकाच्या अखेरच्या काळात देवगिरीच्या यादवांनी राष्ट्रकुटांचा पराभव करून पुणे आपल्या वर्चस्वाखाली आणले. यादव काळातील अनेक वास्तुंचे अवशेष अद्याप पुणे जिल्ह्यात विखुरलेले आढळतात.६

शालिवाहन शके ५३५ इ.स.६१३ म्हणजे सुमारे १४०० वर्षापूर्वी ज्या ठिकाणी हल्ली पुणे आहे, त्या ठिकाणी एक लहानशी वाडी होती. तिच्या पूर्वेस कुंभारली व कासारली ही दोन गावे होती. या गावांची वहिवाट सुमारे सन १२०० मध्ये जुन्नर सुभ्याखाली होती. हा सुभा त्यावेळी मुसलमानांकडे होता. कसब्याचे काही भागावर वस्ती होती. तेथे सुमारे दहा पंधरा घरे होती. त्यात ब्राह्मणांची दोन, बाकीची कोळी, वाजंत्री यांची होता. परंतु या वस्तीतही मारुती, बहिरोबा, पुण्येश्वर आणि नारायणेश्वर ही चार देवांची मंदिरे होती.७

## २. मध्ययुगीन इतिहास

इ.स.१२९० मध्ये दिल्लीहून सय्यद हिसामोहीदीन खताल व त्यांचे पाच अवलिया मुसलमान यांनी येऊन नदीचे काठचे पुणेश्वर व नारायणेश्वर यांस काढून त्यांच्या ठिकाणी दर्गे केले. त्यापैकी पुणेश्वराच्या दर्यास आता धाकटा शेकसल्ला बाबाचा दर्गा म्हणतात. दुसऱ्या दर्यास थोरला शेकसल्ला बाबाचा दर्गा म्हणतात. या दर्यात हिंदूच्या मंदिरांच्या काही खुणा आहेत. त्या मंदिरातील पुजाऱ्यास आदिलशहाने दातील मुजावर बनविण्यासाठी मुसलमान केले. त्या ब्राम्हणाने मुसलमान धर्म स्वीकारल्यावर बादशहाने त्यास आणखी काही जमीन इनाम म्हणून दिली.८

## ३. सुलतानशाही कालखंड:

दिल्लीच्या अल्लाउद्दीन खिलजीने इ.स.१२९४ साली यादवांचा पराभव केला व पुणे दिल्लीच्या सुलतानांच्या सत्तेत आले. १४ व्या शतकाच्या प्रारंभी तुघलकांनी खिलजीचा पराभव करून पुणे येथे आपली सत्ता निर्माण केली. इ.स.१३४० मध्ये मुहम्मद तुघलक दौलताबादहून पुण्यावर स्वारी करण्यासाठी आपल्या फौजेसह कोंढाणा किल्ल्यावर आला. त्यावेळी कोंढाणा किल्ल्याचा किल्लेदार नाग नाईक याने सुलतानापुढे क्षमायाचना केल्याने युद्ध टाळले गेले, मात्र कोंढाणा किल्ल्यासह पुणे सुलतानाच्या ताब्यात गेले.

पुढे तुघलकाचा सरदार हसन गंगु बहामनी याने बंड करून दख्खन देश जिंकून घेऊन बहामनी राज्याची स्थापना इ.स.१३४७ साली केली. त्यामुळे पुणे बहामनी राज्यात सामील करण्यात आले. पुढे अंतर्गत कलहामुळे बहामनी राज्याची पाच शकले होऊन पुणे हे अहमदनगरच्या निजामशहाच्या ताब्यात गेले. या निजामशाहीत भोसले कुळाचा नाव लौकीक होऊन इ.स.१५४५ साली मालोजी भोसले यास पुण्याची जहागिरी निजामशहाने दिली. पुढे काही दिवसांनी ही जहागीरी आदिलशहाकडे गेली.

अहमदनगरच्या निजामशहाचा वजीर मलीक अंबर याने शहाजी भोसले यास इ.स.१६२१ मध्ये पुणे जिंकून घेण्याची आज्ञा केली. त्यावेळी पुणे येथे आदिलशहाच्यावतीने रायराव नावाचा एक अंमलदार कारभार पहात होता. त्याने आदिलशहा व निजामशहा यांच्यातील बिघडलेले संबंध पाहून रायराव रयतेकडून जुलूम जबरदस्तीने पैसे उकळत होता. त्यावेळी शहाजी राजांनी त्याच्यावर हल्ला करून त्याला पुणे-शिरवळ परगण्यातून हद्दपार केले. अशाप्रकारे शहाजी राजे जोपर्यंत आदिलशाहीमध्ये (इ.स.१६२५ ते १६२८) नोकरी


223 of 295
Dr. Babasaheb Ambedkar Mahavidyalaya Aundh, Pune-67
60

E-ISSN : 2348-7143
January.- 2022

करीत होते तोपर्यंत पुणे जहागिरी ही शहाजीराजांच्या ताब्यात होती. मलिक अंबरच्या काळात पुणे येथे रंगो बाबाजी धडपळे हा पुण्याचा ठाणेदार होता. त्याने १६२९-३० च्या मोठया दुष्काळात महत्वपुर्ण कामगिरी केली होती. पेठांची स्थापना करून पुण्यात सुधारणा केल्या. पुढे इ.स.१६३१ साली आदिलशाही सरदार मुरारजगदेव याने पुण्यावर हल्ला केला. एवढेच नव्हे तर पुंडगिरीने वागणारा मोरो तानदेव याला पकडून आणले त्याला नखीमुया टोचून मार देऊन कैद केले. पुढे १६३६ मध्ये निजामशाही नष्ट झाली, शहाजीराजे आदिलशाहीत नोकरी करू लागले. निजामशाहीच्या प्रदेशाची वाटणी करताना आपला पुणे-सुपे-इंदापुर हा जहागीरीचा मुलुख हल्लीचा पुणे जिल्ह्यातील भाग वगळून इतर सर्व प्रदेश मोगल आणि विजापूरकर यांना देऊन टाकला. १६३६ साली आपल्या जहागीरीची व्यवस्था पाहण्यासाठी शहाजीराजांनी दादोजी कोंडदेव याची नियुक्ती केली.[९]

### ४. शिवकालीन पुणे (इ.स.१६३० ते १७०७)

दादोजी कोंडदेव यांनी शिवाजी राजांच्या वास्तव्यासाठी पुणे येथे लालमहाल हा वाडा बांधला. शिवनेरी किल्ल्यावरून मातोश्री जिजाबाई व छत्रपती शिवाजी यांना आणून लालमहाल वाडयात त्यांच्या मुक्कामाची सोय केली. पुण्याचे ग्रामदैवत कसबा गणपतीचा जिर्णोद्धार केला. संरक्षणाच्या दृष्टीने चोख बंदोबस्त करून परागंदा झालेल्या रयतेला बोलावून त्यांना सवलतीने जमिनी लागवडीसाठी दिल्या. अशा प्रकारे पुण्याची पुनर्वसाहत झाली. पुणे हे शहाजीच्या जहागिरीचे मुख्य केंद्र बनले. छत्रपती शिवाजी राजांनी आपल्या स्वराज्याच्या कार्याची मुहूर्तमेढ पुणे जिल्ह्यातील तोरणा किल्ल्यावर केली. दादोजी कोंडदेवच्या मृत्यूनंतर राघोबल्लाळ अत्रे याच्याकडे पुण्याची सुभेदारी होती.

पुढे शिवाजी राजांचा पुण्याशी प्रत्यक्ष संबंध राहिला नाही. सन १६६३ मध्ये मुघल सरदार शाहिस्तेखान पुण्यातील लाल महाल वाडयात येऊन राहिला होता. त्याला पुण्याबाहेर हाकलण्यासाठी छत्रपती शिवाजी राजांनी ६ एप्रिल १६६३ च्या रात्री खानावर छापा घातला. त्यामुळे छत्रपती शिवाजी राजांचा धसका घेऊन पुणे सोडले.[१०]

छत्रपती शिवाजी राजांनी आपल्या स्वराज्याच्या राजधानीचे ठिकाण म्हणून राजगड किल्ल्याची निवड केली होती. पुणे जिल्ह्यातील त्यांनी तोरणा, सिंहगड व पुरंदर हे किल्ले जिंकून स्वराज्याच्या कार्याची सुरूवात केली. नरवीर तानाजी मालुसरे याने कोंढाणा किल्ला आदिलशहाच्या ताब्यातून जिंकून घेताना स्वतःचे प्राण गमावले. पुढे सुरत लुटीनंतर शिवाजी राजांनी आपली राजधानी राजगडहून रायगडला नेली. इ.स.१७०० मध्ये सिंहगडावर छत्रपती राजाराम महाराजांचा मृत्यू झाला. सिंहगडावर छत्रपती राजाराम महाराजांची समाधी आहे. छत्रपती शिवाजी राजांच्या निधनानंतर दिल्लीचा औरंगजेब बादशहा मराठेशाही संपविण्यासाठी मराठी राज्यात आला होता. त्याने कोंढाणा किल्ला जिंकून पुण्यात वास्तव्य केले. त्याचवेळी त्याचा नातु मुहि-उल्मिलत याचा सन १७०३ मध्ये मृत्यू झाला. म्हणून त्याचा स्मरणार्थ पुण्याचे नामांतर मुहियाबाद असे करण्यात आले. पुण्याच्या विद्यमान बुधवार पेठेचे नावदेखील मुहियाबाद पेठ असे ठेवले होते. पण ही दोन्ही नावे फार काळ टिकली नाहीत.[११]

### ५. पेशवेकालीन पुणे (१७०८ ते १८१८)

छत्रपती शाहूच्या काळात बाळाजी विश्वनाथचा छत्रपती शाहू हा मराठयांचा छत्रपती असे पर्यंत सातारा राजधानीला महत्त्वाचे स्थान होते. परंतु सन १७४९ नंतर साताराचे महत्त्व कमी होऊन पुणे येथील

Dr. Babasaheb Ambedkar Mahavidyalaya, Aundh, Pune-67



61

E-ISSN : 2348-7143
January.- 2022

पेशव्यांचे महत्त्व वाढीस लागले. त्यामुळे पुण्याचे ही ऐतिहासिकदृष्टया महत्त्व वाढीस लागले. साताऱ्याच्या छत्रपतीचा संबंध हा फक्त पेशव्यांना पेशवे पदाची वस्त्रे देण्यापुरता मर्यादित राहिला.

बाळाजी विश्वनाथ (१७१७ ते १७१९) या पहिल्या पेशव्यांने इ.स.१७१९ मध्ये मोगलांकडून स्वराज्याच्या सनदा आणल्या व तसेच मोगलाईत असलेले पुणे स्वराज्यात दाखल झाले. बाळाजी विश्वनाथ याने पुण्याच्या आर्थिक विकासास वाव मिळावा म्हणून पुण्याच्या मोगल कोतवालास इ.स.१७१८ मध्ये अशी ताकीद दिली, की व्यापारावर जादा जकात बसवू नये. इ.स. १७२० नंतर पेशव्यांचे लक्ष पुण्यावर केंद्रीत झाले. इ.स.१७२५ मध्ये छत्रपती शाहूने पेशवा पहिल्या बाजीरावास पुणे दिले. तेव्हापासून पुण्याचे महत्त्व वाढीस लागले. बाजीरावाने पुणे येथे बापूजी श्रीपत चित्रावशास्त्री याची पहिला सुभेदार म्हणून नियुक्ती केली. पुण्यातील खाजगीवाले आणि तुळशीबागवाले हे चित्रावशास्त्रीचे जवळचे सहकारी होते. त्यामुळे पुण्याचा कारभार तुळशीबागवाले पाहू लागले. या तिघांनी सुरुवातीच्या काळात पुण्यात पेठा बसविणे, व्यापार-उदिम वाढविणे, बंदोबस्त ठेवणे ही कामे केली. म्हणून पहिल्या बाजीराव पेशव्यास पुण्याचा आद्य संस्थापक असे म्हटले जाते.

छत्रपती शाहू महाराजांच्या मृत्यूनंतर (इ.स.१७४९) नानासाहेब पेशव्याने मराठयांच्या राजकारणांची सर्व सूत्रे पुण्याहून हलविण्यास प्रारंभ केला. नानासाहेब पेशव्याच्या मृत्यूनंतर माधवराव पेशवे, नारायण पेशवे नंतर सवाई माधवराव पेशवे हे पेशवे पदावर आले. पुणे येथे अनेक सरदारांचा उदय झाला. त्यांनी आपले वाडे पुणे शहरात बांधले. उदा. तुळशीबागवाले, रास्ते, मेंहदळे, घोरपडे इत्यादी होत. पुणे येथे पेशव्यांनी व त्यांच्या सरदारांनी अनेक वास्तू व मंदिरे बांधली. मराठयांचे सरदार महादजी शिंदे यांची समाधी वानवडी येथे उभारण्यात आली आहे. तसेच त्या समाधीवर उभारण्यात आलेली छत्री हे पुण्यातील एक प्रेक्षणीय स्थळ आहे. दुसऱ्या बाजीरावाच्या काळात इंग्रजाबरोबर पुणे येथे तिसरे युद्ध सुरू झाले युद्धात इंग्रजांनी मराठयांचा दारूण पराभव केला आणि पुण्याच्या शनिवार वाडयावर युनियन जॅक फडकविला. अशाप्रकारे पुणे हे ठिकाण पेशव्यांच्या ताब्यातून ब्रिटीशांच्या ताब्यात गेले. त्यामुळे पुण्याबरोबरच संपुर्ण महाराष्ट्रावर ब्रिटिशांचा एकछत्री अंमल सुरू झाला.

### ६. ब्रिटिश कालखंडातील पुणे (इ.स.१८१८ ते १९४७)

ब्रिटिश कालखंडाचे तीन उपकालखंड पडतात. पहिला कालखंड सन १८१८ ते १८८६ दुसरा कालखंड हा १८६८ ते १९२० हा होय. तिसरा कालखंड हा १९२१ ते १९४७ हा होय.

### अ) पहिला कालखंड (इ.स.१८१८ ते १८६८)

इ.स.१८१८ साली पुणे हे दख्खन विभागातील ब्रिटीशांचे एक प्रमुख लष्करी ठिकाण म्हणून उदयास आले. इ .स. १८१८ मध्ये पुणे येथे पुणे कॅन्टोन्मेन्टची स्थापना करून तिचा कारभार ब्रिटीश लोक पाहू लागले. इ. स. १८१९ मध्ये विल्यम चॅप्लिन याची पुण्याचा कमिशनर म्हणून नेमणूक झाली. नंतर १८२२ साली खडकी कॅन्टोन्मेन्ट स्थापन झाली. हा कालखंड शांततेचा असल्याने ब्रिटीशांनी पुण्यातील विश्रामबाग वाडयात ६ ऑक्टोबर १८२१ रोजी आधुनिक पद्धतीची पाठशाळा काढली. पुढे सन १८५१ मध्ये डेक्कन कॉलेज ही संस्था स्थापन करण्यात आली. याच डेक्कन कॉलेजमधून पुढे गोपाळ गणेश आगरकर व लोकमान्य टिळक यांनी शिक्षण घेतले. इ.स.१८५७ मध्ये भारतात ब्रिटीशांच्या विरोधात जे बंड झाले, त्यामध्ये पुण्यातील नागरिकांनी फारसा सहभाग घेतला नाही.

'RESEARCH JOURNEY' International E- Research Journal
Issue - 284 : Multidisciplinary Issue
Peer Reviewed Journal
E-ISSN : 2348-7143
January.- 2022

सन १८२३ मध्ये पुणे जिल्ह्यातील सती प्रथा ब्रिटिशांनी बंद केली. ८ फेब्रुवारी १८४० रोजी ब्रिटिशांनी पुणे येथे नगर वाचन मंदिर सुरू केले. १२ फेब्रुवारी १८४९ रोजी ज्ञानप्रकाश नावाचे मराठी वर्तमानपत्र सुरू करण्यात आले. सन १८५१ मध्ये पुण्यात पहिली इंग्रजी शाळा स्थापन केली. तसेच तत्पूर्वी महात्मा जोतिराव फुले यांनी पहिली मुलीची शाळा स्थापन केली. १८५४ मध्ये पुण्यापासून मुंबईपर्यंत तारायंत्र सुरू झाले. पुण्यात १ जून १८५७ रोजी पुणे शहर नगरपालिकेची स्थापन झाली. २३ मार्च १८६४ रोजी मुंबई ते पुणे पहिली आगगाडी सुरू झाली. सन १८६७ मध्ये इंग्रज सरकारने टपालाचे खाते सुरु केले. अशाप्रकारे पुणे शहरात व जिल्ह्यात ब्रिटिशांनी अनेक सुधारणा करून पुण्याची प्रगती केली.१२

**ब) लोकमान्य टिळक कालखंड (१८६८ ते १९२०)**

लोकमान्य टिळकांच्या कार्याची सुरूवात सन १८८० सालापासून झाली. त्यांनी आपल्या ४० वर्षाच्या कारकिर्दीत महाराष्ट्रासह भारतावर आपल्या कार्याचा ठसा उमटवला होता. २ जानेवारी १८८१ रोजी लोकमान्य टिळक, गोपाळ गणेश आगरकर यांनी मराठा या वृत्तपत्राची व ४ जानेवारी १८८१ रोजी केसरी या वृत्तपत्राची स्थापना केली. या वृत्तपत्रातून लोकजागृती, लोकशिक्षण व ब्रिटीश सरकारच्या जुलमी राजवटीविरूद्ध असंतोष पसरवण्याचे महत्त्वपूर्ण कार्य केले. पुणे येथे सन १८९५ साली श्रीगणेशोत्सव व सन १८९६ मध्ये श्री शिवजयंती उत्सव हे दोन उत्सव टिळकांनी सुरू केले.१३ सन १९१६ साली सर परशुरामभाऊ महाविद्यालयाची स्थापना झाली. महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटीची स्थापना सन १८७५ साली झाली. महर्षी धोंडो केशव कर्वे यांनी स्त्री-शिक्षणाचा प्रसार केला. पुणे येथील ब्रिटीशांच्या कारभारावर नियंत्रण ठेवण्यासाठी पुणे सार्वजनिक सभेची स्थापना सार्वजनिक काका उर्फ गणेश वासुदेव जोशी यांनी केली.१४

क्रांतिवीर वासुदेव बळवंत फडके यांनी ब्रिटिशाविरूद्ध बंड पुकारले होते. त्यावेळी त्यांचे वकील पत्र सार्वजनिक काकांनी घेतले होते. क्रांतिवीर चाफेकर बंधूनी इंग्रजी अधिकारी रँड याची २२ जून १८९७ रोजी हत्या केली. त्यावेळी त्यांना ब्रिटिशांनी फासावर चढवले. तेव्हा चाफेकर बंधूनी आनंदाने फाशीची शिक्षा स्वीकारली.१५

लोकमान्य टिळकांनी पुणे शहराचे नाव संपूर्ण भारतभर केले. त्यांच्यावर राजद्रोहाचा खटला सन १९०८ मध्ये भरण्यात आला होता. त्यानुसार त्यांची रवानगी मंडालेच्या तुरूंगात झाली होती. त्यावेळी त्यांनी स्वराज्य हा माझा जन्मसिद्ध हक्क आहे आणि तो मी मिळविणारच. ही राष्ट्रप्रेमाची स्फूर्ती सर्वांना दिली. त्यांना असंतोषाचे जनक असे म्हणतात. लोकमान्य टिळकांनी गीतारहस्य या ग्रंथाची निर्मिती केली.१६ गोपाळ कृष्ण गोखले हे भारतीय राष्ट्रीय काँग्रेसचे अध्यक्ष म्हणून निवडून आले. त्यांना महात्मा गांधीजीनी आपल्या गुरूस्थानी मानले होते. त्यामुळे पुण्याचे नाव आणि लौकिक भारतभर झाला.१७

पुणे जिल्ह्यात अनेक समाजसुधारकांनी समाजसुधारणा केल्याचे दिसून येते. त्यामध्ये डॉ.आनंदीबाई जोशी, महर्षी धोंडो केशव कर्वे, न्यायमूर्ती महादेव गोविंद रानडे, महात्मा फुले, गणेश वासुदेव जोशी इत्यादींनी विधवा पुनर्विवाह, बालविवाह, शेतकऱ्याचे प्रश्न, अस्पृश्यता निवारण, स्त्रीशिक्षण, उच्च-नीच भेदभाव निर्मूलन, सती प्रथा, ब्राह्मण-ब्राह्मणेत्तर संघर्ष यामध्ये सक्रिय सहभाग घेऊन त्यांनी पुणे शहर व जिल्हा या ठिकाणी सुधारणा करण्याचे महत्त्वाचे कार्य केले.१८



63

'RESEARCH JOURNEY' International E- Research Journal
Issue - 294 : Multidisciplinary Issue
Peer Reviewed Journal
E-ISSN : 2348-7143
January.- 2022

**क) महात्मा गांधी युग (सन १९२० ते १९४७)**

महात्मा गांधीजींच्या नेतृत्वाचा प्रभाव पुणे जिल्हयातील काकासाहेब जोशी, केशवराव जेधे, शंकरराव मोरे व अच्युतराव पटवर्धन या युवकांच्यावर पडलेला होता. या युवकांनी काँग्रेसचा प्रसार पुणे शहरासह जिल्हयात केला. महात्मा गांधीजीनी सुरू केलेल्या सविनय कायदेभंग चळवळीत पुणे जिल्हयातील या कार्यकर्त्यांनी तसेच सर्वसामान्य जनतेने ही सहभाग घेतला होता. डॉ.बाबासाहेब आंबेडकर व महात्मा गांधी यांचा सन १९३२ चा पुणे करार पुणे येथील येरवडा कारागृहातच झाला होता. सन १९४२ च्या छोडो भारत आंदोलनामध्ये पुणेकरांनी आत्मीयतेने भाग घेतला होता.[१९]

**समारोप:**

प्राचीन कालखंडातील पुण्याचे अनेक अवशेष आजही पुणे शहर आणि परिसरात आढळून येतात. मध्ययुगीन काळात मुघल काळ ते शिवकाल आंनी पेशवे कालखंड हा पुणे शहरासाठी अत्यंत महत्वाचा काळ होता. या कळात पुणे शहर हे जागतिक शहर म्हणून उदयास आले. आधुनिक काळाची सुरुवात म्हणजेच ब्रिटीशांच्या काळात पुण्याचा विकास खऱ्या अर्थाने झाला राष्ट्रीय चळवळ ही पुण्यापासूनच सुरु झाली असे मानले जाते. थोडक्यात पुनक विषय ते पुणे असा पुणे शहराचा विकास होत गेला.

**संदर्भ :**

1. https://www.census2011.co.in
2. पाठक अरूण (संपा.), पुणे जिल्हा गॅझेटियर, म. राज्य साहित्य संस्कृति मंडळ, मुंबई, १९९९, पृ.१३०.
3. महाजन शां.ग., पुणे शहराचा ज्ञानकोश, पुणे शहराचा ज्ञानकोश प्रतिष्ठान, पुणे, २००४, पृ.१५.
4. महाजन शां.ग., पुणे शहराचा ज्ञानकोश, पुणे शहराचा ज्ञानकोश प्रतिष्ठान, पुणे, २००४, पृ.१६.
5. दैनिक सकाळ, ४ जुलै २००३, पृ.४.
6. महाजन शां.ग., उपरोक्त, पृ. १६.
7. कित्ता, पृ. १६.
8. कित्ता, पृ.१६.
9. कित्ता, पृ.१७.
10. रानडे म.गो., मराठी सत्तेचा उत्कर्ष, मुंबई, १९८९, पृ. ७६.
11. कित्ता, पृ.७९.
12. जोशी ना.वि., पुणे शहराचे वर्णन-१८६८, पुणे, १९९४, पृ.७६
13. कोठेकर शांता व वैद्य सुमन, आधुनिक भारताचा इतिहास, , १९९३ मुंबई, पृ. १२४
14. महाजन शां.गो., उपरोक्त, पृ. २४
15. फडके य.दि, विसाव्या शतकातील महाराष्ट्र खंड-१, १९८९, पृ. १०४
16. कित्ता, पृ.१२१
17. महाजन शां.गो., उपरोक्त, पृ. २४
18. फडके य.दि., उपरोक्त, पृ.५९
19. महाजन शां.गो., उपरोक्त, पृ. २५

Dr. Babasaheb Ambedkar Mahavidyalaya Aundh, Pune-67
Dr. Babasaheb Ambedkar Mahavidyalaya Aundh, Pune-67
227 of 295



64